An International Peer Reviewed & Referred

INTERNATIONAL JOURNAL
OF EDUCATIONAL RESEARCH STUDIES

# शिक्षक–शिक्षणातील व्यावसायिक नितिमत्ता अणि वास्ताविकता

**सहा.प्रा.खिल्लारे सुधीर यशवंता**

एम.ए.,(इंग्रजी,अर्थ) एम.एड्,सेट,नेट शिक्षणशास्त्र

आबासाहेब काकडे शिक्षणशास्त्र महाविद्यालय,शेवगांव

**प्रस्तावना :–**

शिक्षक प्रशिक्षणाला सध्याः "शिक्षक शिक्षण" ही संकल्पना प्राप्त झाली आहे. कोणत्याही देशातील समाजाची गुणवत्ता ही त्या देशातील मिळणारे शिक्षण यावर अवलंबुन असते.शिक्षकाच्या शिक्षणातून उत्तम शिक्षण निर्माण होउन शाळेत अनेक पिढया घडविण्याचे कार्य हे शिक्षक करतात.म्हणून समाजशिक्षणाचा पाया शिक्षक शिक्षण आहे. हा पाया जितका मजबुत तितकी समाज गुणवत्तेची इमारत मजबूत राहील .यासाठी शिक्षण क्षेत्रात सतत चांगल्या शिक्षकांचा पुरवठा शिक्षक शिक्षणाला करावा लागतो.शिक्षक हा शिक्षण प्रक्रियेतील अत्यंत महत्त्वाचा घटक आहे.व्यक्तींचा सर्वांगीण विकास करणे हे शिक्षणाचे मुख्य ध्येय आहे.त्यामुळे व्यक्तीचा शारीरिक,मानसिक,नैतिक व सामाजिक विकास करण्याची जबाबदारी शिक्षकांवर येते. शिक्षकाची जबाबदारी म्हणजे अध्यापन,वर्गाच्या कामावर लक्ष केंद्रिंत करणे,विदयार्थ्यांच्या वर्तनाला वळण लावणे,जबाबदार नागरिक तयार करणे ही होय.हे कार्य शिक्षकांचे शिक्षण करू शकते.व्यक्तीला प्रशिक्षणाने एखादया विशिष्ट क्रियेत कौशल्य प्राप्ती करून देता येते. शिक्षक शिक्षणामध्ये व्यक्तीला अध्यापकीय कार्यासाठी तयार करण्याचा कार्यक्रम पार पाडला जातो.प्रभावी अध्यापक तयार करणे हे या कार्यक्रमाचे लक्ष्य असते तसेच विविध कोशल्यांनी युक्त अशा व्यक्ती तयार करावयाच्या असतात. थोडक्यात अध्यापन कौशल्य,सखोल व अध्यापन ज्ञान जबाबदारी व कर्तव्यांबाबत जागरूकता क्रियाशील वृत्तीचा व्यवसायावर निष्ठा ठेवणारा अध्यापक शिक्षक शिक्षणातून तयार करावयाचा असतो.भावी शिक्षकांना प्रशिक्षण देणारा शिक्षक –प्रशिक्षक संपन्न

व्यक्तिमत्त्वाचा असणे अत्यंत आवश्यक असते. शिक्षकी हा एक व्यवसाय आहे. या व्यवसायाच्या जबादा—या पार पाडण्यासाठी व व्यवसायाचा दर्जा उंचावण्यासाठी काही नियम निश्चित करावे लागतात.असे निश्चित केलेले नियम आणि तत्त्वे म्हणजेच त्या व्यवसायाची नितिमत्ता होय. प्रत्येक व्यवसायाची विशिष्ट अशी नैतिकता असते.

व्यवसाय स्वीकारणा—या प्रत्येक व्यक्तीला त्या विशिष्ट नियमांचे,तत्त्वांचे पालन करणे बंधनकारक असते त्यामुळे त्या विशिष्ट व्यवसायाचा दर्जा राखला जातो. थोडक्यात व्यवसायिक नितिमत्ता म्हणजे कर्तव्य पार पाडण्यासाठी नियमांचे व तत्त्वांचे पालन करणे होय.

**व्यवसायिक नितिमत्ता अर्थ :—**

1. व्यवसायांच्या नियमांची आणि तत्त्वांची निश्चिती म्हणजे व्यवयायिक नितिमत्ता होय.
2. शिक्षकी व्यवसाय व्यवस्थिपणे चालावा आणि या व्यवसायामध्ये गुणात्मकता व व्यावसायिक स्वास्थ्यटिकून राहावे. यासाठी जे नीतिनियम तयार करण्यात आलेआहेत त्याला शिक्षकी व्यवसायाची आचारसंहिता असे म्हटले जाते.

आपल्या देशात All India Federation of Teacher Association (ATFTA) या संस्थेने तसेच अमेरिकत National Education Association या संस्थेने शिक्षकांसाठी आचांरसाहिता तयार केली आहे. शिक्षकांनी आपले वर्तन कसे ठेवावे यासाठी तत्त्वे सांगितली आहेत ती खालीलप्रमाणे

1. लोकशाही समर्थ व निकोप करणाच्या दृष्टीने विदयार्थ्यांच्या व्यक्तिगत क्षमता लक्षात घेउन विकास करणे.
2. शिक्षकाने आपल्या प्रभावी अध्यापनासाठी विदयार्थ्यांची कौटुंबिक माहिती व पालकांचे सहकार्य घेउन त्याचे सामाजिकरण करून त्यांना चांगल्या पध्दतीने घडवावे.
3. शिक्षक हा समाज व शाळा यांच्यात अतूट नाते निर्माण करणारा असावा.
4. शिक्षक स्वतःच्या व्यवसायाचा आदर करणारा असावा.जबबादारीची जाणीव ठेवून श्रध्देने व निष्ठेने काम करणारा असावा.
5. शिक्षकाने समाजमान्य वर्तन केले पाहिजे.समाजाची बंधने पाळली पाहिजेत.

6. शिक्षकांनी आपल्या सहकार शिक्षकांशी,मुख्याध्यापकांशी प्रेमाचे,सहकार्याचे,सलोख्याचे संबंध ठेवावेत.सहकारी शिक्षकांविषयी अनुद्‌गार काढू नयेत.
7. आपल्या व्यवसायाचा दर्जा,सुधारण्यासाठी सतत प्रयत्न करावा.
8. शिक्षकी व्यवसाय,स्वीकारल्यानंतर सर्व अटी व नियमांचे पालन केले पाहिजे आपल्यापेक्षा ज्ञानाने,वयाने श्रेष्ठ असणा–या शिक्षकांना मान द्यावा.आदर बाळगावा.
9. शिक्षकाने कोणत्याही प्रकारचे व्यसन करू नये.

अशा प्रकारे शिक्षकी व्यवसायाचा दर्जा उंचावण्यासाठी,जबाबदारीने कार्य पार पाडण्यासाठी वरीलप्रमाणे नितित्त्वांचे नियम सांतिगतले आहेत त्यांचे पालन करणे आवश्यक आहे.

**शिक्षक प्रशिक्षकाचे गुण**(Quality of Teacher Educator) :–

शिक्षक प्रशिक्षक शिक्षण प्रक्रियेतील 'शिक्षक' या व्यक्तिमत्वास आकार देण्याचा प्रयत्न करतो. शिक्षकांच्या वर्तनबदद्‌लांसाठी शिक्षक प्रशिक्षक प्रयत्न करतो. जबाबदार शिक्षक घडविण्याचे कार्य शिक्षक प्रशिक्षकाला करावयाचे असल्याने त्याच्याकडे विशेष काही गुण असले पाहिजेत त्याची माहिती पुढीलप्रमाणे सांगता येईल.

1. मार्गदर्शन व प्रेरणा देणारा
2. सुसंघटित व सकारात्मक दृष्टिकोन ठेवणारा
3. लोकशाही पध्दतीचा वापर करणारा
4. एकमेकांमध्ये श्रध्दा व विश्वास निर्माण करणारा
5. प्रशिक्षणार्थींस स्वातंत्र्य देणारा
6. प्रशिक्षणार्थींच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी प्रयत्न करणारा
7. विविध गुणांचा अंगीकार असलेला
8. नियमांचे पालन करणारा . इ.

**शिक्षक शिक्षणातील वास्तवता:–**

शिक्षक शिक्षण ही एक महत्त्वाची ज्ञानशाखा आहे.अध्ययन–अध्यापन,अध्ययनकर्ता व अध्यापन या शिक्षणप्रक्रियेशी संबधित बाबी आहे. 2015–16 पासून बी.एड्‌ दोन वर्षाचे केले.दोन वर्षाचे

करण्यामागे अनेक कारणे आहेत त्यापैकी एक म्हणजे बी.एड् चा दोन वर्षाचा अभ्यासक्रम विविध जीवन कौशल्यावर आधारित असून अधिक सक्षम व बहूआयाम असणारा शिक्षक तयार करणारा आहे. यातून विविध हेतू साध्य होतात पण त्याची वास्तवता विचारात घेता दोन वर्षाचा अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर तयार होणारा शिक्षक कितपत स्वाबलंबी होणार याची खरोखरच शंका वाटते. खालील मुद्दयांच्या सहायाने शिक्षक शिक्षणातील वास्तवता मांडता येईल.

**1. पगारातील मोठी तफावत :–**

आजमितीला शिक्षक शिक्षणाची संपूर्ण धुरा ही शिक्षक प्रशिक्षकांच्या खांदयावर आलेली दिसते. कारण महाराष्ट्रात अनुदानित बी.एड् महाविद्यालयापेक्षा विनाअनुदानित बी.एड. महाविद्यलयांची संख्या जास्त आहे. अनुदानित शिक्षणशास्त्र महाविद्यालये व विनाअनुदानित शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील प्राध्यापकांची शैक्षणिक पात्रता,सेवाशर्ती,अटी,नियम,सर्व सारखेच आहेत. परंतु अनुदानित महाविद्यालयातील प्राध्यांपक व विनाअनुदानित महाविद्यालयातील प्राध्यापकांच्या पगारात खुप मोठी तफावत आहे.

**2. विदयार्थ्यांचे घटते प्रमाण :–**

बी.एड् किंवा डी.एड् करून नोकरी लागतच नाही मग बी.एड. किंवा डी.एड् का करायचे? असा प्रश्न विदयार्थ्यांसमोर उभा ठाकतो. भविष्य व सुरक्षितता दोन्हीही नसल्याने विदयार्थ्यांचे बी. एड् करण्याचे प्रमाण आता खूप मोठया प्रमाणात घटतांना दिसते.

**3. विदयार्थ्याच्या गैरहजेरीचे प्रमाण :–**

बी.एड् ला परीक्षेला बसण्यासाठी कमित कमी 80 टक्के हजेरी असावी लागते तर छात्रसेवाकाळात 90 टक्के हजेरी असावी लागते परंतु आता चित्र खूप मोठया प्रमाणात बदलेले आहे. बरेचशे विदयार्थी शनिवार किंवा रविवारी महाविद्यालयात येतात किंवा प्रात्यक्षिक पुरतेच विदयार्थी महाविद्यालयात येतात आणि बी.एड. पूर्ण करतात. हे करत असतांना त्यांना प्राचार्य परवानगी सुध्दा देतात प्राचार्य परवानगी का देतात तर त्यांना 50किंवा 100 कोटा पूर्ण करावयाचा असतो आणि मग जो विदयार्थी केवळ प्रात्यक्षिकापुरताच महाविद्यालयात यतो तो काय मग विदयार्थी समाज,राज्य व देश घडविणार तो तर खरा भष्ट्राचारी निघतो

**4. प्राध्यापकांची शैक्षणिक अर्हता :—**

बी.एड ्महाविद्यालयावर सहायक प्राध्यापक म्हणून रूजू होण्यासाठी शैक्षणिक अर्हता ही एम. ए/एम.एस्सी/एम.कॉम,एम.एड् व नेट किंवा सेट पात्रता परीक्षा उत्तीर्ण व्हावे लागते आणि आता एन.सी.टी.ई नियमानुसर Prespectvieविषयासाठी सामजशास्त्र,मानसशास्त्र किंवा तत्त्वज्ञान या विषयात पदवी संपादन करावीच लागते तेव्हाच त्या महाविद्यालयात नोकरी करण्यास लायक ठरतो अन्यथा नाही.

**5. प्राध्यापकांचे वेतन :—**

वरील शैक्षणिक अर्हता पूर्ण असेल तेव्हाच बी.एड् महाविद्यालयात सहायक प्राध्यापक या पदावर नियुक्ती होते. मात्र वेतन किंवा पगार शासकीय नियमाप्रमाणे दिला जात नाही किंवा शासकीय नियमाप्रमाणे कवळ बॅकेत दाखविला जातो. मात्र खूप अल्प पगार दिला जातो. आणि मग असे म्हणतात .राजाने छळले,नव—याने मारले व पावसाने झोडपले तर दाद कुणाकडे मागायची म्हणून कोणताच प्राध्यापक त्याची तक्रार करत नाही तक्रार केलीतर दुस—या दिवशी त्याला घरी काढून दिले जातेही वास्तवता आहे व त्या ठिकाणी त्यापेक्षाही कमी पगार घेणा—या व्यक्तीची नियुक्ती केली जाते.

**6. कामाच्या वेळा :—**

शिक्षणशास्त्र महाविद्यालयात इतर वरिष्ठ महाविद्यलयापेक्षा खूप मोठया प्रमाणात काम करावे लागते. त्यामुळे संस्था त्या प्राध्यापकांना सकाळी 10 ते सांयकाळी 5.30 पर्यंत महाविद्यालयातच थांबवत असते परंतु त्या प्रमाणात मात्र त्यांना वेतन दिले जात नाही व इतर ही कामे त्यांच्याकडून करून घेतली जातात उदा. लेखापाल यांची कामे

**7. रजा :—**

शासकीय नियमाप्रमाणे शैक्षणिक अर्हता पाहिजे,शासकीय नियमाप्रमाणे ,काम पण झाले पाहिजे शासकीय नियमाप्रमाणे तास पण घेतले पाहिजे. मात्र शासकीय नियमाप्रमाणे रजा मिळत नाही शासकीय नियमप्रमाणे वेतन मिळत नाही आणि तेव्हा सांगितले जाते की आपले महाविद्यालय विनाअुनदानित आहे त्यामुळे 12रजा पेक्षा जास्त रजा घेतल्या तर त्या बिनपगारी रजा असतात. त्यां रजांच्या पगार मिळत नाही लगेच LWPमस्टर वर लिहले जाते.परंतु शोकांतिका ही आहे की एखादा प्राध्यापक रजेवर जात असतांना तो आपल्या कामाचा भार आपल्या सहकार्यावर

सोपवतो.त्या सहकार्याला केवळ कामाचा भारच सोसावा लागतो.मात्र त्या कामाचा मोबदला त्या सहकार्याला मिळत नाही  ही एक प्रकारची छुपी गुलामगिरीच नाही का? स्वतंत्र भारतातील उच्च शिक्षणधारकाची केवळ पोटांची खळगी भरण्यासाठी अशा  प्रकारची गुलामगिरी पत्करावी लागते .

**8. विदयार्थ्यांच्या शिक्षण शुल्कावर कर्मचा—यांचे वेतन :—**

विनाअनुदानित महाविद्यलयातील कर्मचा—यांचे पगार हे विदयार्थ्यांच्या शिक्षण शुल्कांवर अलंबून असतात. विदयार्थी शिक्षण शुल्क वेळेवर भरत नाही त्यामुळे कर्मचा—यांचे पगार चार चार महिने उशीरा होतात पगार उशिरा होत असल्यामुळे त्यांना खूप मोठया प्रमाणात अर्थिक चणचण भासते त्याचा परिणाम त्यांच्या अध्यापनावर होतो त्यांना खूप मोठया प्रमाणात नैराश्य निर्माण होते.

**9. शिक्षण शुल्क वेळेवर न भरण्याचे कारणे :—**

गेल्या चार वर्षापासून महाराष्ट्रावर वरूण राजाची कमी जास्त प्रमाणात अवकृपाच झाली आहे त्यामूळे बहुतांश विदयार्थ्यांचे पालक हे शेतकरी,शेतमजुर असल्याने ते विदयार्थ्यांची किंवा आपल्या पाल्यांची फी वेळेवर भरू शकत नाही त्याचा विघातक परिणाम सगळयाच घटकांवर घडून येताना आपणास दिसतो.

**10. समाजाचा शिक्षकांकडे,शिक्षण क्षेत्राकडे पाहण्याचा नकारात्मक बदलना दृष्टीकोन :—**

गेल्या 10 वर्षापूर्वी बी.एड कडे डी.एड कडे पाहण्याचा खूप चांगला समाजाचा दृष्टीकोन होता गावातील एखादा विदयार्थांचा केवळ बी.एड ला जरी प्रवेशीत झाला तरी त्याला गावात तेव्हापासून मास्तर/सर म्हणायचे पंरतु आज ही परिस्थिती खूप बदलली त्याला कारणेही तशीच आहेत योग्य मार्गाने विदयार्थी बी.एड, डी.एड करत नाहीत त्यामुळे समाजाचा शिक्षकांकडे किंबहुना शिक्षण क्षेत्राकडे पाहण्याचा त्याचा दृष्टीकोन नकारात्मक होत चालला आहे ही वास्तविकता आहे.

**समारोप :—**

शिक्षण हा माणसाचा तिसरा डोळा  आहे शिक्षणाने माणुस संसंस्कृत बनतो .परंतु ते शिक्षण देणा—या शिक्षकाला घडविण्याचे जे काम करतात त्यांच्यावर जर उपासमारची पाळी आली असेल तर ते काय शिक्षक घडवणार ? असे म्हणतात की सैन्य हे पोटावर चालते त्यामगाचा

उददेश हा असतो की त्यांच्या पोटात जर अन्न असेल तर ते लढाई करू शकतील. अगदी त्याच प्रमाणे शिक्षक प्रशिक्षकांना पगार नसेल, तोही वेळेवर नसेल तर तो काय शिक्षक घडविणार, आणि घडलेला शिक्षक काय विदयार्थी,समाज,राष्ट्र,देश घडविणार ? म्हणून शिक्षक प्रशिक्षणातील मुख्य मेख(शिक्षक प्रशिक्षक ) जर उपाशी असेल तर कोणते शैक्षणिक बदल आपल्या देशात होणार? म्हणून केवळ शिक्षक प्रशिक्षकांची नितिमत्ता,आचारसंहिता,व्यावसायिकता,मोजण्यात किंवा शिक्षक शिक्षणातील चिंता करण्यास काय अर्थ आहे.? . म्हणून सरकारने,शासनाने,समाजाने,शैक्षाणिक संस्थांनी यावर वेळीच लक्ष देणे खूप महत्त्वाचे असणार आहे.

## संदर्भ सूची

मोरे,डॉ.चंद्रकांत भिलेगावकर,डॉ.सदानंद(2009) शिक्षक शिक्षण :नित्य नुतन प्रकाशन पुणे

,डॉ.न.रा.(2007) शिक्षणाची तात्त्विक व समाजशास्त्रीय :नित्य नुतन प्रकाशन पुणे

शिक्षण अणि समाज, वर्ष 38 अंक 2 जानेवारी ते मार्च 2015

कुंडले डॉ.म.बा. (2016) शिक्षण समिक्षा वर्ष 49 वे अंक 5 पुणे